अधिसूचना

क्रमांक : १९५/२०२५ दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२५.

विषय : २०२३-२०२४ शैक्षणिक सत्राची स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती.

सर्व संबंधितांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती दाननिधी विनियमातील तरतुदीप्रमाणे, उन्हाळी २०२३ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, विज्ञान स्नातक भाग - १ व भाग - २ या परीक्षांमध्ये पदार्थ विज्ञान या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणारे व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अनुक्रमे विज्ञान स्नातक भाग -१, भाग - २ व भाग - ३ च्या अभ्यासक्रमास पदार्थ विज्ञान विषयासह २०२३-२०२४ शैक्षणिक सत्रामध्ये प्रवेश घेतलेले खाली नमूद केलेले विद्यार्थी २०२३-२०२४ शैक्षणिक सत्राची स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरले आहेत.

२०२३-२०२४ या शैक्षणिक सत्राची उपरोक्त शिष्यवृत्ती खालील विद्यार्थ्यांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	नांव व महाविद्यालय	उत्तीर्ण	प्रवेशित परीक्षा	प्राप्त वर्ग	शिष्यवृत्तीची गुण रक्कम
१.	**श्री हर्षदीप सुनिल गवई** श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णिवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला	H.S.S.C.	B.Sc.I	८९	२५०/-
२.	**कु. वैष्णवी पंढरीनाथ आटोळे** श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली	H.S.S.C.	B.Sc.I	८९	२५०/-
३.	**कु. श्रावणी रमेश अहेर** फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.	B.Sc.I (Sem.I&II)	B.Sc.II (Sem.III)	२७७	५००/-
४.	**श्री आनंद नारायण बारंगे** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	B.Sc.II (Sem.III&IV)	B.Sc.III (Sem.V)	२८१	५००/-

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

अधिसूचना

क्रमांक : १९६/२०२५ दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२५.

विषय : २०२३-२०२४ शैक्षणिक सत्राची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती.

सर्व सामान्यांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती दाननिधी विनियम क्र. ३१/१९९८ मधील तरतुदीप्रमाणे, **कु. चारु राजू आपोतीकर** या विद्यार्थीनीने वाङमय स्नातक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन व या अभ्यासक्रमाच्या इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन २०२३-२०२४ या शैक्षणिक सत्रामध्ये श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे वाङमय पारंगत भाग-१ (इतिहास) या वर्गात प्रवेश घेतलेला असल्यामुळे, सदर विद्यार्थिनी २०२३-२०२४ या शैक्षणिक सत्राच्या रु. २,८००/- च्या वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेली आहे.

२०२३-२०२४ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. २,८००/- (अक्षरी रु. दोन हजार आठशे फक्त) ची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती कु. चारु राजू आपोतीकर यांना प्रदान करण्यात येत आहे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****